महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड

दुरध्वनी क्र.. - ०२४६२-२१६३१६
E-mail Id- ig.nandedrange@mahapolice.gov.in

नियंत्रण कक्ष क्रमांक. - ०२४६२ -२१६२५३
बसवेश्वर चौक, नविन कौठा, सिडको रोड, नांदेड-४३१६०३

जा.क्र.पोउपमनि/आस्था-१/पोनि-प्रशासकिय बदल्या-२०२६/ 4549364 दिनांक ३१/०५/२०२६

31 MAY 2026

**वाचा :- १) महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ मधील कलम २२ न (२)**

**२) परिक्षेत्रीय आस्थापना मंडळाच्या दिनांक ३१/०५/२०२६ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेला निर्णय**

**विषय :- नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांच्या परिक्षेत्रांतर्गत सर्वसाधारण बदल्या-२०२६.**

--- ००० ---

**आदेश :-**

उपरोक्त संदर्भात नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ (न) मधील पोट कलम (२) नुसार परिक्षेत्रीय आस्थापना मंडळ यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील नमुद **नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांच्या प्रशासकीय** कारणावरुन परिक्षेत्रीय आस्थापना मंडळाचे मान्यतेने त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या जिल्हयात बदल्या करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पोलीस निरीक्षकांचे नाव | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण | बदलीचा घटक |
|---|---|---|---|
| १ | श्री. जगन गणपती पवार | नांदेड | स्थगिती |
| २ | श्री. दिपक लक्ष्मण दंतुलवार | परभणी | स्थगिती |
| ३ | श्री. सुधाकर मुरलीधर बावकर | लातूर | स्थगिती |

१. पोलीस अधीक्षकांनी उपरोक्तप्रमाणे बदली झालेल्या नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांना तात्काळ कार्यमुक्त करावे. बदली झालेल्या नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांना कार्यमुक्त करतांना पर्यायी/बदलीवर येणाऱ्या पोलीस निरीक्षकाची वाट पाहू नये. तसेच, बदली आदेशानंतर जे पोलीस अधिकारी रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना रुग्ण निवेदनाच्या तारखेपासुन स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे.

२. संबंधित नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांना बदली घटकात कार्यमुक्त करतांना त्यांना अदा करावयाच्या कार्यमुक्त आदेशात "संबंधीत नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांनी त्यांना कार्यमुक्त केले दिनांकापासून विहीत मुदतीत बदलीच्या घटकात निश्चितपणे हजर व्हावे आणि ते विहीत मुदतीत हजर न झाल्यास त्यांच्याविरुध्द पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र.२/५५/०७, दिनांक ११.१.१९८४ व दिनांक २३.२.१९९७ मधील सूचनांप्रमाणे विनाविलंब शिस्तभंगविषयक कारवाई सुरु करण्यात येईल" ही बाब स्पष्टपणे नमुद करावी.

३. बदली आदेशातील नि:शस्त्र पोलीस निरीक्षक दरम्यानच्या काळात निलंबित झाले असतील तर अशा निलंबित नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांना बदली ठिकाणी कार्यमुक्त न करता त्याबाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच अशी कोणतीही अपवादात्मक परिस्थिती निर्माण झाली असेल तर त्याबाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

४. कोणत्याही घटकात निवडणूकीची प्रक्रीया किंवा त्याअनुषंगाने आचारसंहिता सुरु असल्यास घटकप्रमुखांनी संबंधीत निवडणुक अधिकाऱ्याशी संपर्क साधून आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घेवून संबंधीत नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांना कार्यमुक्त करावे व तसा अनुपालन अहवाल सादर करावा.

५. बदली आदेशात नेमणुक केलेल्या ठिकाणात अशंत: बदल करणे/बदली रद्द करणे/बदलीस स्थगीती देणे अशा प्रकारच्या विनंतीची या कार्यालयातर्फे दखल घेतली जाणार नाही.

६. संबंधीत पोलीस निरीक्षकांना कार्यमुक्त केल्याचा आणि ते बदलीच्या घटकात हजर झाल्याचा दिनांक त्याच दिवशी ई-ऑफिसव्दारे या कार्यालयास सादर करावा.

31/05/2024

**( शहाजी उमाप )**
**पोलीस उप महानिरीक्षक**
**नांदेड परिक्षेत्र, नांदेड**

प्रति,

पोलीस अधीक्षक, नांदेड, लातुर, परभणी

**प्रत सविनय सादर-**

**मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रत- गोपनीय शाखा, परिक्षेत्रीय पोलीस पत्रिका, पोउपमनि कार्यालय, नांदेड परिक्षेत्र, नांदेड